https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852 E-ISSN: 3049-1541

KNOWLEDGE FLAME

INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)

(An International Indexed & Peer Reviewed Journal)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना येणाऱ्या आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचा अभ्यास

**डॉ. संदिप गोरख साळवे**

**सहायक प्राध्यापक – अर्थशास्त्र विभाग**

**मत्स्योदरी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अंबड महाराष्ट्र.**

**मो. ९४०४५०९७९४**

**सारांश :**

प्रस्तुत संशोधन कार्ये विद्यापीठ स्तरावरील आहे. प्रस्तुत संशोधन कार्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या प्रवासाच्या समस्या, अध्ययन सामग्रीची समस्या, ग्रंथालयाची समस्या, ट्युशन शुल्काची समस्या, परीक्षा शुल्काची समस्या, अभ्यास खोलीची समस्या, इत्यादी समस्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**मुख्य शब्द** – उच्च शिक्षणातील समस्या, जात-प्रवर्ग, अध्ययन कोर्स.

## प्रस्तावना–

वर्तमान परिस्थितीत भारतात ३.५७ कोटी युवक उच्च शिक्षण घेत आहेत. कोणत्याही देशाची सामाजिक, आर्थिक विकास त्या देशाच्या उच्च शिक्षणाच्या प्रगतीवर अवलंबवून असतो. भारतात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यापुढे अनेक समस्या आहेत. विकसनशील देशाच्या तुलनेत भारतातील उच्च शिक्षणाचे प्रमाण खूपच नगण्य आहे.

वर्तमान संशोधन कार्ये महाराष्ट्र राज्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना येणाऱ्या प्रवासाच्या समस्या, अध्ययन सामग्रीची समस्या,ग्रंथालयाची समस्या, परीक्षा शुल्काची समस्या, ट्युशन शुल्काची समस्या, अभ्यास खोलीची समस्या, विद्यार्थ्यांची जात, अध्ययन कोर्स इत्यादी घटकांचा सविस्तर अभ्यास करण्यात आलेला आहे.

## संशोधनाची उदिष्टे

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे उच्च शिक्षण घेतांना विद्यार्थ्यांना येणाऱ्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे उच्च शिक्षण घेतांना विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करणे.

## संशोधन परिकल्पना

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे उच्च शिक्षण घेतांना विद्यार्थ्यांना येणाऱ्या आर्थिक समस्या येतात.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे उच्च शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना शैक्षणिक समस्या येतात.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन कार्ये वर्तमान काळाशी सबंधित आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन कार्याच्या पूर्ततेसाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**तथ्य संग्रहण स्रोत**

प्रस्तुत संशोधन कार्ये वर्तमान काळाशी सबंधित आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाच्या पूर्ततेसाठी तथ्य संग्रहाणाच्या प्राथमिक स्रोताचा उपयोग करण्यात आलेला आहे. तसेच तथ्य संग्रहाणाच्या दुय्यम स्रोताचा देखील आधार घेण्यात आलेला आहे.

**तथ्य संकलन साधन**

प्रस्तुत संशोधन कार्याच्या पूर्ततेसाठी सर्वेक्षण या संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आल्यामुळे तथ्य संकलनासाठी प्रश्नावली या साधनाचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**सांख्यिकीय तंत्र**

संकलित करण्यात आलेल्या तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी या सांख्यिकीय तंत्राचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**नमुना निवड**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे उच्च शिक्षण घेणाऱ्या ३० प्रतिसादकांची प्रस्तुत संशोधन कार्याच्या पूर्ततेसाठी निवड करण्यता आलेली आहे.

**नमुना निवड तंत्र**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे उच्च शिक्षण घेणाऱ्या ३० विद्यार्थ्यांची सहेतुक पद्धतीने प्रस्तुत संशोधन कार्याच्या पूर्ततेसाठी निवड करण्यात आलेली आहे.

**संशोधनाची व्याप्ती**

प्रस्तुत संशोधन कार्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात उच्च शिक्षण घेणाऱ्या खुला, ओ.बी.सी. आणि एस.टी. प्रवर्गातील ३० विद्यार्थ्यापुरतेच सीमित आहे.

**संशोधनाची मर्यादा**

प्रस्तुत संशोधन कार्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्याचे कितपत निराकरण होईल, हे निशितपणे सांगता येत नाही.

- **तथ्य विश्लेषण**

**तक्ता क्रमांक – १**


**विद्यार्थ्यांचा प्रवर्ग**

| अ.क्र. | प्रवर्ग | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | खुला | १२ | ४०% |
| २ | ओ.बी.सी. | १२ | ४०% |
| ३ | एस.टी. | ०४ | १३% |
| ४ | मुस्लिम | ०२ | ६.६७% |
| ५ | एकूण | ३० | १००% |

**आधार – क्षेत्रीय कार्ये**

वरील तक्ता क्रमांक १ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे उच्च शिक्षण घेणाऱ्या विविध प्रवर्गातील विद्यार्थ्यांची आकडेवारी दर्शविलेली आहे. तक्त्यातील सांख्यिकीय आकडेवारी वरून असे स्पष्ट होते की, प्रतिसादक म्हणून एकूण चार प्रवर्गातील प्रतिसादकांनी सहभाग नोंदवलेला आहे. एकूण प्रतिसादकापैकी ४०% प्रतिसादक खुल्या प्रवर्गातील आहेत. ४०% प्रतिसादक ओ.बी.सी. प्रवर्गातील आहेत. १३% प्रतिसादक एस.टी. प्रवर्गातील आहेत. ६.६७% प्रतिसादक मुस्लिम प्रवर्गातील आहेत.

https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852 E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)





**तक्ता क्रमांक – २**

**तुमच्या अभ्यासाचा कोर्स कोणता आहे?**

| अ. क्र. | कोर्स | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पी.जी. | २४ | ८०% |
| २ | पीएच.डी. | ०३ | १०% |
| ३ | पीडीएफ | ०३ | १०% |
| ४ | एकूण | ३० | १००% |

**आधार – क्षेत्रीय कार्य**

प्रस्तुत तक्ता क्रमांक दोन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा कोर्स दर्शवतो. तक्त्यातील सांख्यिकीय आकडेवारीवरून असे दिसून येते की, एकूण प्रतिसादकापैकी ८०% प्रतीसादाकाच्या अभ्यासाचा कोर्स पदव्युत्तर पदवी आहे. १०% प्रतिसादकाच्या अभ्यासाचा कोर्स विद्यावाचस्पती आहे. तर १०% प्रतिसादकाच्या अभ्यासाचा कोर्स पीडीएफ आहे.




**तक्ता क्रमांक – ३**

**तुमच्या राहत्या ठिकाणापासून विभागापर्यंत पोहचण्यासाठी प्रवासाची समस्या येते का?**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २० | ६६.६७% |
| २ | नाही | १० | ३३.३३% |
| ३ | एकूण | ३० | १००% |

**आधार – क्षेत्रीय कार्य**

उपरोक्त तालिका क्रमांक 3 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या राहत्या ठिकाणापासून तासिका विभागापर्यंत पोहचण्यासाठी येणाऱ्या प्रवास समस्यांचा उहापोह करण्यात आलेला आहे. एकूण प्रतिसादकापैकी ६६.६७ टक्के प्रतिसादकाना राहत्या ठिकाणापासून विभागापर्यंत पोहचण्यासाठी प्रवासाच्या समस्या येतात. तर ३३.३३ टक्के प्रतिसादकाना विभागापर्यंत पोहचण्यासाठी प्रवासाची कोणतीही समस्या येत नाही





**तालिका क्रमांक – ४**

**अध्ययन करण्यासाठी लागणाऱ्या पुस्तकांचे स्रोत तुमच्याकडे पर्याप्त आहेत?**

| अ. क्र. | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ०९ | ३०% |
| २ | नाही | २१ | ७०% |
| ३ | एकूण | ३० | १००% |

**आधार – क्षेत्रीय कार्य**

वरील तक्ता क्रमांक ४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्याथ्यांना येणाऱ्या अध्ययन सामुग्रीच्या समस्यांची मांडणी केलेली आहे. तक्त्यातील सांख्यिकीय आकडेवारीवरून असे स्पष्ट होते कि, एकूण प्रतिसादकापैकी ३० टक्के प्रतिसदाकाना अध्ययन पुस्तके प्राप्त करण्यात समस्या येतात. तर ७० टक्के प्रतिसादकाना अध्ययन पुस्तके प्राप्त करण्यात कोणत्याही समस्या येत नाहीत.





**तालिका क्रमांक – ५**

**तुमच्या अभ्यास खोलीत तुम्हाला अभ्यासाच्या सर्व सुविधा प्राप्त होतात का?**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १२ | ४०% |
| २ | नाही | १८ | ६०% |
| ३ | एकूण | ३० | १००% |

**आधार – क्षेत्रीय कार्य**

वरील तक्ता क्रमांक पाच मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे उच्च शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अभ्यास खोलीच्या समस्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. प्रस्तुत तक्त्यातील आकडेवारीवरून असे स्पष्ट होते कि एकूण प्रतिसादकापैकी ४० टक्के प्रतिसादकाना अभ्यास खोलीतील सुविधांच्या अडचणी येतात परंतु ६० टक्के प्रतिसादकाना अभ्यास खोलीच्या कोणत्याही अडचणी येत नाहीत.



https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852 E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)


**तालिका क्रमांक – ६**

**निम्न आर्थिक परिस्थितीच्या कारणास्तव ट्युशन शुल्क आणि परीक्षा शुल्क भरण्यासाठी तुम्हाला समस्या येतात का?**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २५ | ८३.३३% |
| २ | नाही | ०५ | १६.६७% |
| ३ | एकूण | ३० | १००% |

**आधार – क्षेत्रीय कार्य**

वरील तक्ता क्रमांक सहा मध्ये निम्न आर्थिक परिस्थिमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना येणाऱ्या परीक्षा आणि ट्यूशन शुल्काच्या समस्यांची मांडणी करण्यात आलेली आहे. तक्त्याखालील सांख्यिकीय आकडेवारीवरून असे स्पष्ट होते कि एकूण प्रतिसादकापैकी ८३.३३ टक्के प्रतिसादकाना ट्युशन शुल्क आणि परीक्षा शुल्क भरण्यासाठी समस्या येतात.परंतु १६.६७ टक्के प्रतिसादकाना निम्न आर्थिक परिस्थितीच्या कारणास्तव परीक्षा शुल्क आणि ट्युशन शुल्क भरण्यासाठी कोणत्याही समस्या येत नाहीत.




## निष्कर्ष

१. एकूण प्रतिसादकापैकी ८०% प्रतिसादकाचा अध्ययन कोर्स पदव्युत्तर पदवी आहे.

२. एकूण प्रतिसादकापैकी ६६.६७% प्रतिसादकाना प्रवासाच्या समस्या येतात.

३. एकूण प्रतिसादकापैकी ३०% प्रतिसादकाना अभ्यासाची पुस्तके प्राप्त करण्याचे स्रोत पर्याप्त प्रमाणात उपलब्ध नाहीत.

**(परिकल्पना क्रमांक दोन याठिकाणी सिध्द होते)**

४. एकूण प्रतिसादकापैकी ४० % प्रतिसादकाना त्यांच्या अभ्यास खोलीत अभ्यासाच्या सुविधा प्राप्त करण्यात समस्या येतात.

५. एकूण प्रतिसादकापैकी ८३.३३%प्रतिसादकाना बिकट आर्थिक परिस्थितीमुळे परीक्षा शुल्क आणि ट्यूशन शुल्क भरण्यासाठी समस्या येतात.

**(परिकल्पना क्रमांक 1 याठिकाणी सिध्द होते)**

**संदर्भसूची**

1. Field work.

2. Nog Manish Protiom, "A study of socio Economics Problems of Scheduled Cast Student in Higher Education Special reference to Assam." International Journal of engineering Science and Computing 8, no.3 (2018): 16473-16474-16475.

3. Mudukappa Karegouda, "Problems of Scheduled Tribes Bellary District: A Survey." International journal of Science Research 4 no. 1 (2015): 449-451.

4. Ganjoo Priyanka, "Educational Status of Scheduled Cast women in Marh area of Jammu District." Journal of Interdisciplinary cycle XII. No. V. (2020) : 1217-1219-1221-1223-1224.

5. D. Suresh, Venkatesh Swami, "Education and Health status among Scheduled Tribes in India : An Overview." SPWI Journal for Social Walfare 2 no. 3 (2019) : 8-7.

6. Marilon Lokimidis, "Socioeconomic Status and its Effects on Higher Education Opportunity: The case of Greece." Scientific Research 07, no. 06 (2017) : 1-2.